# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


जा.क्र.विकाऔ/**आस्था-३**/२०११/**७८९८**

दिनांक :- **२६/०९/२०११.**

प्रति,

मा. संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,

म.रा., मुंबई-१.

**(लक्षवेध :- कार्यासन क्रमांक:१६)**

**विषय :-शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कर्मशाळेत कार्यरत असणा-या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनामात बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत.**

**संदर्भ:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई-१ यांचे पत्र क्रमांक:१६/ आस्था/२०११/४२, दिनांक १२/०९/२०११.**

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्था/कार्यालयातील शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कर्मशाळेत कार्यरत असणा-या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनामात बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत या कार्यालयात **दिनांक २१/०९/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता या कार्यालयाच्या सभागृहात महेश शिवणकर, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद** यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

| अ. क्र. | अधिका-यांचे नांव सर्वश्री | पदनाम | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ. वा. झि. गंधारे | प्राचार्य | शा.अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद |
| ०२ | डॉ. सी. एस. थोरात | प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतुर |
| ०३ | पी. आर. पट्टलवार | प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |
| ०४ | डॉ. ए. व्ही. पेशवे | प्र. प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ०५ | बी. के. कुंभार | प्र. प्राचार्य | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातुर |
| ०६ | एस. बी. विश्वरुपे | प्र. प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड जि. जालना |
| ०७ | पी. डी. पोपळे | प्र. प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली |
| ०८ | सी. व्ही. लहाडे | प्र. प्राचार्य | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातुर |
| ०९ | ए. जी. गुरु | प्र. प्राचार्य | शासकीय तंत्रनिकेतन, बीड |
| १० | दि. मा. लोकमनवार | विभाग प्रमुख | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड |
| ११ | बी. व्ही. लासुणे | कर्मशाळा अधिक्षक | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड, जि. जालना |
| १२ | डी. व्हि. तम्मेवार | कर्मशाळा अधिक्षक | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | व्ही. बी. उस्केवार | प्रभारी कर्मशाळा अधिक्षक | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड |
| १४ | व्ही. बी. शेप | प्र.कर्मशाळा अधिक्षक | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातुर |
| १५ | एल. एम. माने | अधिव्याख्याता यंत्र | पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातुर |
| १६ | एस. डी. भुसे | प्रबंधक | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद |
| १७ | एस. एस. शिंदे | अधिव्याख्याता यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, बीड |
| १८ | एम. जी. राठी | प्राध्यापक | शासकीय अभि. महा., औरंगाबाद |
| १९ | व्ही. ए. कुलकर्णी | कर्मशाळा अधिक्षक | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |
| २० | वा. ना. देशपांडे | प्रशासकीय अधिकारी | विभागीय कार्यालय, औरंगाबाद |

उपरोक्त बैठकीमधील चर्चेचा गोषवारा सोबत जोडला आहे.

आपला विश्वासू,

सोबत :- गोषवारा

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत, मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे यांना माहितीस्तव.
प्रत, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना माहिती व कार्यवाहीस्तव.

C:\Deepak/Asta3\Work-shop sanghtna/DSSonawane/26092011\1-2

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**विषय :-शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कर्मशाळेत कार्यरत असणा-या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनामात बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत.**

शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये येथे कर्मशाळेत कार्यरत असणा-या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या पदनामात बदल व सुधारीत वेतन संरचना मागणीबाबत या कार्यालयात दिनांक २१/०९/२०११ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित बैठकीमधील चर्चोअंती ठळक मुद्दे.

१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (MSBTE) सुधारीत अभ्यासक्रमानुसार कर्मशाळेतील प्रात्याक्षिकांची संख्या अतिशय कमी झाली असून काही सेमीस्टरमध्ये एकाही जॉब चे प्रात्याक्षिक नसते.

२) वर्तमान पदनामात बदल करुन "कर्मशाळा निदेशक" हे समान पदनाम करण्याच्या संघटनेच्या मागणी संदर्भात एकच पदनाम दिल्यास Welding, Carpentry, Turing इ. विभागाशी संबंधीत कामाचे वाटप करण्यास अडचणीचे होईल. म्हणून पदनामात बदल केल्यास सुधारीत पदनाम कर्मशाळा निदेशक-कातारी विभाग/जोडारी विभाग/कारपेंटरी विभाग इ. प्रमाणे असावे.

३) वर्तमान पदनामे जातीवाचक नसून व्यवसाय वाचक आहेत. तसेच लोहार व सुतार वगळता इतर पदनामे जातीवाचक नाहीत.

४) कर्मशाळा निदेशकांच्या कर्तव्य, जबाबदा-या निश्चीत करण्यात येवून तसेच अभिरक्षक, सर्वसाधारण यांत्रिकी, विजतंत्री, इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक इ. तांत्रिक पदावर काम करणा-या मात्र प्रात्याक्षिके घेण्यात थेट सहभाग नसणा-या कर्मचा-यांची देखील कर्तव्ये व जबाबदा-या निश्चीत करण्यात याव्यात.

५) शासकीय तंत्रनिकेतन, बीड, उस्मानाबाद वगळता या विभागातील इतर सर्व संस्थामधे "नियमानुसार काम" या भुमिकेमूळे प्रात्याक्षिके बंद आहेत.

६) सर्व संस्था प्रमुखांनी संबंधित कर्मशाळेतील कर्मचा-यांना त्यांनी पुर्वी प्रमाणेच काम करावे व याबाबतीत शासनाचा निर्णय होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्याचे ठरले.

७) प्रात्याक्षिके पुर्ण करुन घेण्यासाठी संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक व इतर वर्ग-३ कर्मचारी, ज्यांच्याकडे आय.टी.आय./तत्सम पात्रता आहे यांचे देखील सहाय्य घेण्यात येईल. तसेच जवळपासच्या आय.टी.आय. संस्थेचे देखील सहाय्य घेण्याची उपाययोजना करावी असे सांगण्यात आले.

८) सप्टेंबर अखेरपर्यंत कर्मचा-यांनी पुर्ववत काम सुरु न केल्यास <u>No Work No Pay</u> तत्वानुसार पुढील वेतन रोखण्यात यावे अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

**C:\Deepak/Asta3\Work-shop sanghtna/DSSonawane/26092011\1-2-3**